अर्थ व सांख्यिकी संचालनालयातील "संशोधन अधिकारी/सांख्यिकी अधिकारी, गट-ब (राजपत्रित)" संवर्गात सन-२०१२ च्या निवडसूचीतून पात्र ठरलेल्या "संशोधन सहायक" यांना "संशोधन अधिकारी/सांख्यिकी अधिकारी, गट-ब (राजपत्रित)" या पदावरील पदोन्नतीचा नियमित दिनांक देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

नियोजन विभाग,

शासन आदेश क्र.ज्येष्ठसू-१२१५/प्र.क्र.२००/का.१४२७

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक :-८/२/२०२२.

**आदेश :-**

"संशोधन अधिकारी/सांख्यिकी अधिकारी, गट-ब (राजपत्रित)" पदावरील पदोन्नतीसाठी सन-२०१२ च्या निवडसुचीतून पात्र ठरलेल्या खालील तक्यात नमूद "संशोधन सहायक, गट-ब (अराजपत्रित)" यांना या आदेशान्वये "संशोधन अधिकारी/सांख्यिकी अधिकारी, गट-ब (राजपत्रित)" पदावर नियमित पदोन्नती देण्यात येत आहे. सदर कर्मचाऱ्यांचा नियमित पदोन्नतीचा दिनांक त्यांच्या नावासमोर स्तंभ-४ मध्ये दर्शविलेल्या प्रमाणे देण्यात येत आहे :-

| अ.क्र. | अधिका-याचे नांव | प्रवर्ग | संशोधन अधिकारी/सांख्यिकी अधिकारी, गट-ब (राजपत्रित) पदावरील नियमित पदोन्नतीचा दिनांक |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ५ |
| १ | श्रीमती क.पं.तळेकर | खुला | ०१/०९/२०१२ |
| २ | श्री.ला.क.पाटील | खुला | ०३/०९/२०१२ |
| ३ | श्री.नि.त्रि.ठाकरे | खुला | ०१/१०/२०१२ |
| ४ | श्री.अ.ना.पाटील | खुला | ०१/१०/२०१२ |
| ५ | श्रीमती वि.अ.अडके | खुला | ०१/११/२०१२ |

| | | | |
|---|---|---|---|
| ६ | श्री.कै.स.गजभिये | अजा | ०१/११/२०१२ |
| ७ | श्री.बा.भो.चव्हाण | विजा अ | १७/११/२०१२ |
| ८ | श्री.हि.दि.जाधव | विजा अ | ०१/१२/२०१२ |
| ९ | श्री.शं.दा.पवार | खुला | ०१/०१/२०१३ |
| १० | श्री.अ.दि .राजूरवार | खुला | ०१/०६/२०१३ |
| ११ | श्री.प्र.व.पाटील | खुला | ०१/०६/२०१३ |
| १२ | श्री.प्र.त्र्यं.पोळ | भज ड | ०१/०७/२०१३ |
| १३ | श्री.दि .क.रोकडे | खुला | ०१/०७/२०१३ |

२. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र.२७९७/२०१५ मध्ये दिनांक ४/८/२०१७ रोजी दिलेल्या निर्णयाविरोधात राज्य शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ दाखल केली आहे. सदर याचिका अद्याप प्रलंबित असून मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ च्या अंतिम निर्णयाच्या अधीन सदर नियमित पदोन्नतीचे सुधारित दिनांक देण्यात येत आहेत.

३. वरीलप्रमाणे नियमित पदोन्नती ही पदोन्नत होणाऱ्या कर्मचाऱ्यांविरुद्ध कोणतीही विभागीय चौकशी प्रलंबित नाही अथवा त्यांना पदोन्नती देण्यासाठी बाधा येईल, अशी कोणतीही शिक्षा विभागीय चौकशीत देण्यात आलेली नाही, या धारणेच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(प्र. ब. घाडगे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१. संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई.
   - यांनी विनंती करण्यात येते की, सदर आदेश अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात यावेत.
२. संबंधित संशोधन अधिकारी/सांख्यिकी अधिकारी (अर्थ व सांख्यिकी संचालनालयामार्फत).
३. निवडनस्ती.